**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai – 400 020
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.
Telegram: UNIWOMEN
Website : sndt.ac.in

आस्था-०१/जन-१२/२०२३-२४/ 424

जून ०७, २०२३

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/विभाग प्रमुख/प्राचार्य/समन्वयक/प्रभारी,
विद्यापीठ संचलित महाविद्यालये/पदव्यूत्तर विभाग/संस्था/केंद्र,
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ,
चर्चगेट, जुहू व पुणे आवार.

विषय : विद्यापीठ अनुदानित व विनाअनुदानित विभागातील/महाविद्यालयातील रिक्त पदांवर नियुक्त करण्यात येणा-या अध्यापकांचे तासिका तत्वावर प्रदान करावयाच्या मानधनाचे दर व निवड समितीच्या बैठकीसाठी मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी व मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रतिनिधींबाबत

संदर्भ : मा. कुलगुरू यांचे आदेश क्र. ७१५ (अ) दि. ३० मे २०२३

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन विषयांस अनुसरुन, आपणांस कळविण्यात येते की, मा. कुलगुरू यांच्या आदेशान्वये, अनुदानित रिक्त पदे व विद्यापीठ विनाअनुदानित विभागातील रिक्त पदांवर शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता नियुक्त करण्यात येणा-या अध्यापकांना तासिका तत्वावर प्रदान करावयाचे दर व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता एकमुठी वेतनावर नियुक्ती करणेकामी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून निश्चित करण्यात येत आहेत.

**अ) अनुदानित पदव्यूत्तर विभाग व संचलित महाविद्यालयांमधील अध्यापकांचे मानधनाचे दर, अटी व सूचना :**
**विद्यार्थी प्रवेशित असल्यास एकमुठी वेतनावर अध्यापकांची नियुक्ती करणे**

रू. २५०००/- प्रति महिना

रू. ५००/- तासिका तत्वावर

कालावधी : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ किंवा नविन भरती प्रक्रीया होईल, यापैकी जे आधी घडेल तेवढया कालावधीसाठी

**अटी :**

- अध्यापकाची शैक्षणिक पात्रता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तरतुदींनुसार पूर्ण करीत असावा.
- सदर विषयाचा कार्यभार किमान १६ तास प्रति आठवडा पदव्यूत्तर विभाग व २० तास प्रति आठवडा महाविद्यालयांमध्ये शिल्लक असावा.
- रिक्त पद ज्या प्रवर्गासाठी राखीव असेल त्या प्रवर्गास प्राधान्य देण्यात यावे.

**निवड प्रक्रिया :**

- विद्यापीठाच्या संकेतस्थळावर रिक्त पदांची जाहिरात प्रसिध्द करुन प्राप्त अर्जांची छाननी करावी.
- मा. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी घेवून स्थानिक निवड समिती गठित करावी. (नामनिर्देशित केलेल्या प्रतिनिधींची यादी सोबत जोडून पाठवित आहोत)
- स्थानिक निवड समितीवर एक विषयतज्ञ घेण्यात यावा.
- स्थानिक निवड समितीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.
- स्थानिक निवड समितीच्या अहवालानुसार एकमुठी वेतनावर नियुक्त करण्यात येणा-या अध्यापकांचे आदेश विद्यापीठातून निर्गमित करण्यात येतील.

...०२

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai – 400 020
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.
Telegram: UNIWOMEN
Website : sndt.ac.in



**सूचना :**

- सेवानिवृत्त अध्यापक व संबंधित अभ्यासक्रमाशी निगडीत व्यवसायातील तज्ञ व्यक्ती यांना तासिका तत्वावरील अध्यापनासाठी प्राधान्य देण्यात यावे.
- प्रत्यक्ष उपलब्ध कार्यभार व एकमुठी वेतनावरील मानधन प्रदान याबाबत अनियमितता आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / पदव्यूत्तर विभागाचे विभाग प्रमुख यांची राहील.
- सदर सुधारीत दर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू रहातील.
- सदर नियुक्त्यांचा वित्तीय भार पुर्णपणे विद्यापीठावर येत असल्याने विद्यार्थिनीं संख्येच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार एकमुठी वेतनावर किंवा तासिका तत्वावर कमीतकमी नेमणूका करण्यात याव्यात. तासिका तत्वावरील नेमणूक करीत असताना रू. २५,०००/- पेक्षा अधिक मानधनाची रक्कम होवू नये याची काळजी घेण्यात यावी. तसे आढळल्यास विद्यापीठाकडून रक्कम मंजूर होणार नाही.
- ज्या विभागात/महाविद्यालयात विद्यार्थीसंख्या ५०% पेक्षा कमी असेल ~~व कार्यभार कमी असेल~~ तिथे अस्थायी शिक्षकांची १५,०००/- किंवा १०,०००/- या एकमुठी वेतनावर किंवा तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात यावी.
- ज्या विभागात/महाविद्यालयात एकाच विषयात विद्यार्थीसंख्या ५०% पेक्षा कमी असेल व ~~कार्यभार कमी असेल~~ अशा विषयामध्ये UG/PG महाविद्यालय विभागामध्ये शिक्षक उपलब्ध असतील व संबंधीत विभागाचा कार्यभार कमी असेल अशा महाविद्यालय विभागामध्ये UG/PG विभाग प्रमुखांच्या आदेशाने कार्यभार सोपविण्यात यावा.

**ब) विनाअनुदानित पदव्यूत्तर विभाग व संचलित महाविद्यालयांमधील अध्यापकांचे मानधनाचे दर, अटी व सूचना :**
**(सदर सुधारीत वेतन हे विभाग व महाविद्यालयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार होतील)**

विद्यापीठ विनाअनुदानित पदव्यूत्तर विभाग व संचलित महाविद्यालयामधील अध्यापकांना एकमुठी वेतनावर नियुक्ती करणे किंवा तासिका तत्वावर नियुक्ती करण्यासाठी उपरोक्त नमूद (अ) प्रमाणे अटी, निवड प्रक्रिया व सूचना लागू रहातील. याव्यतिरिक्त, रू. २५०००/- पेक्षा अधिक एकमुठीवेतनावर (Consolidated Salary) किंवा सैद्वांतिक (Theory) रू. ५००/- प्रति तास व प्रात्यक्षिक (Practical) रू. २५०/- प्रति तास या सुधारीत दरांपेक्षा अधिक वेतन अदा करावयाचे असल्यास विभाग प्रमुख/ प्राचार्यांनी आपल्या विभागाची/महाविद्यालयाची वेतनखर्चासाठी करण्यात आलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीच्या अनुषंगाने विद्यापीठ वित्तीय समिती व व्यवस्थापन परिषद यांच्याकडून अतिरिक्त एकमुठी वेतन मंजूर करून घेण्यात यावे. तद्नंतर, रिक्त पदांच्या जागेवर तात्पुरत्या नियुक्त्या करण्यात याव्या. ज्या विभाग प्रमुखांना व प्राचार्यांनी अतिरिक्त एकमुठी वेतन वाढवून घेतलेले आहे त्यांनी उपरोक्त 'अ' मध्ये नमूद केलेल्या स्थानिक निवड समितीमार्फत निवड प्रक्रिया करण्यास हरकत नाही.

मा. कुलगुरू यांच्या आदेशान्वये स्थानिक निवड समितीवर नामनिर्देशित केलेले कुलगुरू यांचे प्रतिनिधी व मागासवर्गीय प्रतिनिधी :

| अ. क्र. | प्रतिनिधी | नाव व पदनाम |
|---|---|---|
| | | चर्चगेट आवार |
| ०१ | मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी | ➢ डॉ. निलेश ठाकरे, प्राध्यापक (कॅस) व विभाग प्रमुख, पदव्यूत्तर मानसशास्त्र विभाग, मुंबई.<br>➢ डॉ. दर्शना ओझा, सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, पदव्यूत्तर गुजराती विभाग, मुंबई |

...०३

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai – 400 020
Phone : +91 22 2203 1879
Fax : +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग,
मुंबई - ४०० ०२०.
Telegram: UNIWOMEN
Website : sndt.ac.in



| अ. क्र. | प्रतिनिधी | नाव व पदनाम |
|---|---|---|
| | | **चर्चगेट आवार** |
| | मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रतिनिधी | ➢ प्रा. सुनिता साखरे, प्राध्यापक व विभाग प्रमुख, पदव्यूत्तर हिंदी विभाग, मुंबई<br>➢ डॉ. सुनिल रामटेके, प्राध्यापक (कॅस), पदव्यूत्तर मराठी विभाग, मुंबई |
| | | **जुहू आवार** |
| | मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी | ➢ डॉ. मीरा देसाई, प्राध्यापक (कॅस) व विभाग प्रमुख, पदव्यूत्तर मास कम्युनिकेशन अ‍ॅन्ड एक्स्टेंशन विभाग, जुहू<br>➢ डॉ. अंशू शर्मा, प्राध्यापक (कॅस) व विभाग प्रमुख, पदव्यूत्तर टेक्स्टाईल सायन्स अ‍ॅन्ड अ‍ॅपॅरल डिझाईन विभाग, जुहू<br>➢ डॉ. मनजीत कौर चौहान, सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, पदव्यूत्तर रिसोर्स मॅनेजमेंट विभाग, जुहू |
| | मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रतिनिधी | ➢ डॉ. चंद्रशेखर गवळी, सहयोगी प्राध्यापक (कॅस) व विभाग प्रमुख, पदव्यूत्तर हयूमन डेव्हलपमेंट विभाग, जुहू |
| | | **पुणे आवार** |
| | मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी | ➢ डॉ. शितल मोरे, प्राध्यापक (कॅस), पदव्यूत्तर संगित विभाग, पुणे<br>➢ डॉ. सचिन देवरे, प्राध्यापक (कॅस), पदव्यूत्तर भूगोल विभाग, पुणे<br>➢ डॉ. रश्मी हसमनिस, सहयोगी प्राध्यापक, पदव्यूत्तर वाणिज्य विभाग, पुणे |
| | मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रतिनिधी | ➢ डॉ. विरेंद्र नगराळे, प्राध्यापक (कॅस), पदव्यूत्तर भूगोल विभाग, पुणे |

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत माहितीस्तव रवाना :

१. मा. कुलगुरू यांचे कार्यालय, २. मा. प्र. कुलगुरू यांचे कार्यालय, ३. मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय, ४. उपकुलसचिव (आस्थापना व सामान्य प्रशासन विभाग), ५. उपकुलसचिव (विशेष कक्ष), ६. एस.पी.पी. युनिट